महाराष्ट्र राज्यात वन वणवा आटोक्यात आणण्याच्या आधूनिक पध्दतीसाठी सन-२०१७-१८ या आर्थिक वर्षात अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

महसुल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांक : एफडीसी-२०१७/ प्र.क्र.४५/फ- ५

मंत्रालय, मुंबई -४००० ०३२

दिनांक :- २१ मार्च, २०१८

वाचा - १) शासन निर्णय क्रमांक - एफडीसी-२०१७/प्र.क्र.४५/फ-५, दि.१०.०७.२०१७

२) वित्त विभाग शासन परिपत्रक क्र.अर्थसं/२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.०६.०२.२०१८

३) अपर प्रधान मुख्य वन संरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास) यांचे पत्र क्रमांक कक्ष-१/पी/यो/चाबाप्र/प्र.क्र.१०२/२२४४/१७-१८, दि.१४.०३.२०१८

प्रस्तावना -

भारत सरकार आणि अन्न व कृषि संघटना संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम योजनेद्वारे महाराष्ट्र राज्यातील वन वणवा आटोक्यात आणण्यासाठी व बहुमूल्य वन संपदेचे अग्निपासून रक्षण करण्यासाठी आधुनिक वन वणवा प्रतिबंधक प्रकल्प १९८४ पासून राबविण्यात येत असून महाराष्ट्र वन विकास महामंडळ हा प्रकल्प शासनाचा अभिकर्ता म्हणून राबवित आहे.

शासन निर्णय :-

महाराष्ट्र राज्यातील वन वणवा आटोक्यात आणण्यासाठी व बहुमूल्य वन संपदेचे अग्निपासून संरक्षण करण्यासाठी आधुनिक वन वणवा प्रतिबंधक प्रकल्पा अंतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी रु.२५०.०० लक्ष इतक्या रक्कमेची तरतूद अर्थसंकल्पित करण्यात आली आहे.

उपरोक्त दि.१०.०७.२०१७ च्या शासन निर्णयान्वये सदर रक्कमेपैकी रुपये १७५.०० लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे. वित्त विभागाच्या उपरोक्त दिनांक ०६.०२.२०१८ च्या परिपत्रकानुसार अर्थसंकल्पित निधीच्या ८० % निधी वितरणास मान्यता देण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने अपर प्रधान मुख्य वन संरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास) यांनी त्यांच्या उपरोक्त दि.१४.०३.२०१८ च्या पत्रान्वये महाराष्ट्र वन विकास महामंडळास सन २०१७-१८ मध्ये देय असलेल्या अभिकरण खर्चाची उर्वरित रक्कम रु.२५.०० लक्ष वितरीत करण्याची विनंती केली आहे. त्यानुसार सन २०१७-१८ करीता वन संरक्षण आग विझविण्याचा आधुनिक पध्दती या

योजनेसाठी रु.२५.०० लक्ष (रुपये पंचवीस लक्ष फक्त) इतका निधी वितरीत व खर्च करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

सदर खर्च विहित कार्यपध्दतीनुसार व अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर उपलब्ध मासिक निधी प्रवाहानुसार खर्ची टाकण्यात यावा. यामध्ये कोणतीही अनियमितता होणार नाही याची दक्षता घ्यावी.

सदर खर्च मागणी क्रमांक सी ७ प्रदानशिर्ष २४०६ वनीकरण व वन्यजीव (योजनेत्तर) १९० सार्वजनिक क्षेत्र व इतर उपक्रमांना सहाय्य (००) (०१) महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित यांस प्रदान मुख्य वन संरक्षक (वनबल प्रमुख) नागपूर यांचेमार्फत देय असलेला अभिकरण खर्च (२४०६ ०६६८) ५० इतर खर्च या लेखाशिर्षखाली सन २०१७-१८ करीता मंजूर असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक क्र.अर्थसं/२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.०६.०२.२०१८ अन्वये प्रशासकीय विभागाना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारात निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३२११२५१५३७६१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Vaishnav M N
Date: 2018.03.21 13:01:46 +05'30'

(म.न.वैष्णव)

कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग

प्रति,

(१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) , महाराष्ट्र राज्य, नागपूर
(२) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ, नागपूर
(३) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) , महाराष्ट्र राज्य, नागपूर
(४) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर
(५) महालेखापाल, १/२ (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखापरीक्षा), मुंबई/नागपूर.
(६)कक्ष अधिकारी (व्यय-१०)(विनियम)/, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
(७) ब-१/फ-२ कार्यासन, महसूल व वन विभाग ,मंत्रालय, मुंबई.
(८) निवड नस्ती, फ-५